<u>नियमित दावा क्रमांक ६२/२०१६ मधील</u>
<u>निशाणी क्रमांक ५ वरील आदेश.</u>
<u>CNR NO. MHSN07-000-531-2016</u>

वादी यांनी निशाणी ५ वरील अर्ज दिवाणी प्रक्रिया सहिंतेच्या आदेश ३९ नियम १, २ व दिवाणी प्रक्रिया सहिंता कलम १५१ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे.

वादीचे निशाणी ५ मधील अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की -

<u>मिळकतींचे वर्णन</u> -

२. जिल्हा व तुकडी सांगली, तालुका व पोट तुकडी कवठेमहांकाळ पैकी मौजे घाटनांद्रे येथील शेतजमीन मिळकती -

१/१ गट नंबर ६१९ क्षेत्र ५६ आर यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | रस्ता, |
| पश्चिमेस | - | गट नंबर ६२०, |
| दक्षिणेस | - | गट नंबर ६२४ व |
| उत्तरेस | - | गट नंबर ६१८ |

१/२ गट नंबर ६१८ क्षेत्र ५७ आर यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | रस्ता, |
| पश्चिमेस | - | गट नंबर ६२०, |
| दक्षिणेस | - | गट नंबर ६२४ व |
| उत्तरेस | - | गट नंबर ६१८ |

१/३ गट नंबर ६२३ क्षेत्र ०३ आर यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | गट नंबर ६२४ |
| पश्चिमेस | - | गट नंबर ६२२, |
| दक्षिणेस | - | गट नंबर ६२४ व |
| उत्तरेस | - | गट नंबर ६२१ |

१/४ गट नंबर ६२१ क्षेत्र ७४ आर यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | गट नंबर ६१८, |
| पश्चिमेस | - | ओढा, |
| दक्षिणेस | - | गट नंबर ६२२, ६२४ ते ६२९ व ६२० |
| उत्तरेस | - | गट नंबर ५९२, ६०२, ६०८ |

१/५ गट नंबर ३५२ क्षेत्र ३ हेक्टर १७ आर यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | गट नंबर ३, |
| पश्चिमेस | - | गट नंबर ३५० व ३४९, |
| दक्षिणेस | - | गट नंबर ३४८ व |
| उत्तरेस | - | गट नंबर ३५१ व ३५३ |

१/६ गट नंबर १००५ क्षेत्र १२ हेक्टर ६८ आर व पोट खराब १० आर पैकी उत्तर बाजुचे १/२ हिस्सेचे क्षेत्र ६ हेक्टर २४ आर यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | गट नंबर १००६, |
| पश्चिमेस | - | गट नंबर १००४ व १००२, |
| दक्षिणेस | - | नं.म.पैकी बाळासो तातोबा शिंदे याच्या हिश्याची जमीन |
| उत्तरेस | - | गट नंबर १००४, १००६ |

१/७ सिटी सर्वे नंबर २३५ क्षेत्र ३४०.६ चौरस मिटर यासी चतुःसिमा -

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | रस्ता व सिटी सर्वे नंबर ३३७, |
| पश्चिमेस | - | रस्ता, |
| दक्षिणेस | - | सिटी सर्वे नंबर २३४ |
| उत्तरेस | - | रस्ता |

यातील उत्तरेकडील १/२ हिस्सेचे क्षेत्रात बांधीव मिळकत अंदाजे ५४० चौरस फुट ५० वर्षापुर्वीची तिचा ग्रामपंचायत मालमत्ता नंबर ४४९ ही वादींच्या ताब्यात असुन उर्वरीत १/२ हिस्सेची मिळकत ही प्रतिवादी नंबर १ च्या ताब्यात असुन त्यास ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक ८२४ असा आहे.

१/८ सिटी सर्वे नंबर २३४ क्षेत्र ४२०.१ चौरस मिटर यासी चतुःसिमा -

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | रस्ता व सिटी सर्वे नंबर ३३७, |
| पश्चिमेस | - | रस्ता, |
| दक्षिणेस | - | सिटी सर्वे नंबर २३३ |
| उत्तरेस | - | र२३५ |

पैकी पश्चिम-दक्षिण कोप-याची २६.५ चौरस मिटर उकिरड्याची खुली जागा वादीच्या ताब्यात व पुर्व-दक्षिण कोप-याची २६.०५ चौरस मिटर उकिरड्याची खुली जागा प्रतिवादी नंबर १ च्या ताब्यात व उर्वरीत जागा प्रतिवादी नंबर २ च्या ताब्यात आहे.

३. वादीचे असे कथन आहे की त्यांचे मुळ पुरुष पांडु आप्पा शिंदे यांच्या ०१.०५.१९३६ रोजीच्या निधनानंतर तातोबा, येदु, परशराम व महादु अशी चार मुले असुन परशराम हे १९३३ साली व त्याची पत्नी अंजुबाई ही ०१.१२.१९९८ रोजी निपुत्रीक मयत झाली. त्याचप्रमाणे महादु शिंदे हे २९.०३.१९३३ व त्याची पत्नी कृष्णाबाई ही दिनांक १६.०८.१९९५ रोजी निपुत्रीक मरण पावले. पुढे वादीनी त्यांना तातोबा व येदु हेच कायदेशिर वारस होते, असे कथन मांडले आहे. तातोबा पांडु शिंदे हे दिनांक ०१.०२.१९७३ रोजी निपुत्रीक वारले. त्यांच्या नंतर त्यांच्या पत्नी चंद्राबाई हिचे नांव वारस म्हणुन त्यांच्या मिळकतीस नोंद झाले. मयत तातोबा यांच्यापासुन चंद्राबाई हिस दोन मुली म्हणजे प्रतिवादी नंबर ९ व १० आहेत. पुढे त्यांना मुलगा नसल्याचे कथन मांडले आहे.

४. सन १९७३ साली घाटनांद्रे गावचे गट बांधणीवेळी चंद्राबाई तातोबा

शिंदे व येदु पांडु शिंदे यांनीच फक्त शेत जमिनीचे सरसनिरस मानाने वाटप घेतल्याचे सांगुन दोघांना खालीलप्रमाणे मिळकत आल्याचे नमुद केले आहे.

येदु पांडु शिंदे यांच्या घाटनांद्रे येथील खाते नंबर २५९ वरील मिळकती -

| अ.क्र. | सर्वे नंबर | क्षेत्र हेक्टर आर |
|---|---|---|
| १ | ५८/१/२ | ०.७८ |
| २ | ५८/१/३+२अ | १.४८ |
| ३ | ५८/१/४+२ब | ०.६० |
| ४ | ५८/१/६ | ०.३१ |
| ५ | १११/१/१ | ०.५८ |
| ६ | १११/१/२ | ०.०३ |
| ७ | १११/१/३ | ०.०२ |
| ८ | १११/१/४ | ०.११ |

चंद्राबाई तातोबा शिंदे यांच्या घाटनांद्रे येथील खाते नंबर ८१ वरील मिळकती -

| अ.क्र. | सर्वे नंबर | क्षेत्र हेक्टर आर |
|---|---|---|
| १ | ५८/१/२ | १.८९ |
| २ | ५८/१/२ | ०.३९ |
| ३ | १११/४ | ०.०३ |
| ४ | १११/१/८ | ०.११ |

५. त्यानुसार चंद्राबाई व येदु यांची नावे मिळकती स्वतंत्रपणे नोंद झाले

असल्याचे कथन मांडले आहे. पुढे सर्वे नंबर यांचे वेगवेगळे गट पडल्याचे नमुद केले आहे. सर्वे नंबर १८१ व १११/१/७ मध्ये चंद्राबाई तात्या शिंदे व येदु पांडु शिंदे यास प्रत्येकी समाईकात १/२ हिस्सा दिल्याचे नमुद करत त्यास अनुक्रमे गट नंबर १००५ व ६२३ देण्यात आल्याचे व त्यानुसार सातबारा सदरी नाव लावल्याचे सांगितले आहे.

६. चंद्राबाई व येदु यांच्यामध्ये घर मिळकतींचे व गट नंबर १००५ व ६२३ यांचे सरसनिरस मानाने कधीही वाटप झाले नसल्याचे सांगितले आहे. येदु पांडु शिंदे यांचे दिनांक १४.१०.१९७९ रोजी निधन झाल्याचे सांगुन त्यांस वादी व प्रतिवादी नंबर १ ते ८ असे वारस असल्याचे नमुद करुन फेरफार नंबर १२६ दिनांक १७.०५.१९८० रोजी तशी नावे सातबारा सदरी लागल्याचे नमुद केले आहे. येदु यास वादी व प्रतिवादी नंबर १ व २ ही मुले तर प्रतिवादी नंबर ३ ते ८ या मुली असल्याचे नमुद केले आहे. पैकी प्रतिवादी नंबर २ बाळासो हा दिनांक १२.०५.१९८६ रोजी चंद्राबाई तातोबा शिंदे हिस मुलगा नसल्याने हिंदु धर्म शास्त्रानुसार दत्तक केल्याचे सांगुन सदरचे दत्तक विधान दुय्यम निबंधक कार्यालय, अ.क्र.३८७ वर नोंदल्याचे सांगितले आहे. त्यानुसार प्रतिवादी नंबर २ बाळासो याचा जनक पिता येदु शिंदे यांच्या मिळकतीतील सर्व वारसा हक्क संपुष्टात आल्याचे सांगुन दत्तक गेल्यापासुन ते चंद्राबाईकडे रहात असल्याचे व तिची मिळकत वहिवाटत असल्याचे सांगितले आहे.

७. पुढे वादी सांगतात की त्यांच्या व प्रतिवादी नंबर १ ते १० यांच्या वडिलार्जित गावठाणातील मिळकतींस बापुसो पांडु शिंदे यांचे एकत्र कुटुंब प्रमुख म्हणुन नाव असल्याचे नमुद करत सिटी सर्वे चौकशीच्या वेळी गावठाणातील वडिलार्जित मिळकतीस चालता नंबर १६५ व १६६ यास सिटी सर्वे नंबर २३५ दिल्याचे नमुद करत त्यावरील बापुसो शिंदे यांचे ए.कु.मॅ. म्हणुन असलेले नाव कमी करुन वादी व प्रतिवादी नंबर १ व २ यांची नोंद करण्यात आल्याचे सांगितले आहे. त्याचप्रमाणे चालता नंबर १६७ ही तात्या पांडु शिंदे यांची वडिलार्जित मिळकत असल्याने त्यास सिटी सर्वे नंबर २३४ देण्यात येवुन चंद्राबाई हिच्या नावाची नोंद करण्यात आल्याचे सांगितले आहे. सदर दोन्ही मिळकती या चंद्राबाई व येदु यांच्या वडिलार्जित, मालकी

वहिवाटीच्या असल्याचे नमुद केले आहे. येदु याची पत्नी चंपाबाई ही सन १९९८ मध्ये मयत झाली असुन त्यांना वादी  व प्रतिवादी नंबर १, ३ ते ८ असे वारस असल्याचे नमुद केले आहे. चंद्राबाई तातोबा शिंदे हि १६.१०.१९९५ रोजी मयत झाल्याचे नमुद करुन त्यांना प्रतिवादी नंबर २, प्रतिवादी नंबर ९ व प्रतिवादी नंबर १० हे वारस असुन त्यापैकी प्रतिवादी नंबर २ चे नांव त्यांच्या सातबारा पत्रकी नोंद झाल्याचे सांगितले आहे. प्रतिवादी नंबर २ यांचा दत्तक विधानानंतर येदु यांच्या मिळकतीतील हक्क संपुष्टात आले असतांना गट नंबर ६२१, ६२३, ६१८, ६१९, ३५२, १००५ पैकी १/२ हिस्सा व सिटी सर्वे नंबर २३५ या मिळकतीवरुन कमी झाले नसल्याचे नमुद केले आहे. वर नमुद मिळकती पैकी १/२ हिस्सा वादी व प्रतिवादी नंबर १ यांच्या ताब्यात असल्याचे नमुद केले आहे.

८. अलिकडे प्रतिवादी नंबर २ व त्यांची मुले हे दत्तक पत्रापुर्वीची प्रतिवादी नंबर २ यांच्या पोकळ नावाच्या नोंदीचा आधार घेवुन अंगजोराच्या बळावर जमिनीत हक्क, हिस्सा सांगु लागले आहेत व वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करत ताबा घेण्याचे प्रयत्न चालु केले आहेत. सिटी सर्वे नंबर २३४ पैकी पश्चिम-दक्षिण कोप-याचे २६.०५ चौरस मिटर क्षेत्र वादीस त्यांच्या हिश्याचे क्षेत्र, पुर्व-दक्षिण कोप-याचे २६.०५ चौरस मिटर क्षेत्र प्रतिवादी नंबर १ यास व उर्वरीत क्षेत्र प्रतिवादी नंबर २ यांस वहिवाटीस दिल्याचे सांगितले आहे. सिटी सर्वे नंबर २३४ मध्ये पुर्वापार प्रतिवादी नंबर १ यांच्या क्षेत्रात उकिरडा असल्याचे नमुद करत सदर क्षेत्रास वादी व प्रतिवादी नंबर १ यांचे नांव नमुद नसल्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी नंबर २ व त्यांची मुले अंग बळाच्या जोरावर सदर उकिरड्यामध्ये दिनांक ११.०४.२०१६ रोजी दगड व जुन्या बांधकामाच्या विटा आणुन टाकुन वादी व प्रतिवादी नंबर १ च्या वहिवाटीस हरकत अडथळा करत दिनांक २१.०४.२०१६ रोजी प्रतिवादी नंबर २ यांनी उकिरडा बुजविला असल्याचे सांगितले आहे. त्या अनुषंगाने पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याचे सांगितले आहे. सिटी सर्वे नंबर २३४ व २३५ चे वादी व प्रतिवादी नंबर १ ते १० यांच्या दरम्यान कधीही सरसनिरस मानाने वाटप झाले नसल्याचे सांगुन ते वाटप होवुन व तुटक कब्जा मिळण्यासाठी व त्या अनुषंगाने प्रतिवादी नंबर २ यानी वादी व

प्रतिवादी नंबर १ यांच्या वहिवाटीस हरकत अडथळा करु नये यासाठी दावा दाखल केल्याचे नमुद केले आहे.

९. त्याचप्रमाणे वादीनी गट नंबर १००५ पैकी २ आणे ८ पै बाबत प्रतिवादी नंबर २ यांनी प्रतिवादी नंबर ११ यांना खरेदी देण्याचा करार प्रतिवादी नंबर १ शी संगनमत करुन दिनांक ०९.१०.२००३ रोजी केला असल्याचे सांगितले आहे. त्याचप्रमाणे सदर करारात वादीचे नाव लिहले होते परंतु वादीस मान्य नसल्याने व दस्त करण्यास नकार दिल्याने त्यांचे नांव खोडल्याचे नमुद केले आहे. प्रतिवादी नंबर २ याने त्यास अधिकार नसतांना सदर विकल्याचे नमुद करत ते खरेदीखत वादी व प्रतिवादी नंबर १ वर बंधनकारक नसल्याचे जाहीर होवुन मिळावे, असे नमुद केले आहे. त्याचप्रमाणे गट नंबर १००५ पैकी २.१३ आर क्षेत्राबाबतच्या व्यवहाराबाबत कथन मांडुन त्याबाबत दाद मागणार असल्याचे सांगितले आहे, अशी परिस्थिती मांडुन दावा गुणावर चालण्यास बराच कालावधी लागणार असल्याचे नमुद करत त्यांच्या पक्षात सकृतदर्शनी केस, दाव्याचा समतोल असल्याचे नमुद करत प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

१०. प्रतिवादी नंबर २ यांनी निशाणी ४४ कडे कैफियत व तुर्तातुर्त ताकीद अर्जास त्यांचे म्हणणे सादर केलेले आहे. त्यांनी दाव्यातील व अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी नंबर २ याने वादीच्या पुर्वीच्या वाटपाबाबतच्या कथनांत सत्यता नसल्याचे नमुद करत कोणताही कागदोपत्री पुरावा नसल्याचे कथन मांडले आहे. गट बांधणेच्या नोंदीस वाटपाने झालेल्या नोंदी म्हणण्याचा चुकीचा व सावधनुकीचा प्रयत्न वादी करत असल्याचे सांगितले आहे. सर्वे नंबर व गटाच्या तुलनेबाबत चुकीचे नंबर व वर्णन नमुद केल्याचे सांगितले आहे. प्रतिवादी नंबर २ यांचे वडील येदु हे सन १९७९ साली मयत झाल्याचे नमुद करुन प्रतिवादी नंबर २ चे दत्तक पत्र दिनांक १२.०५.१९८६ रोजीचे असल्याचे नमुद करत दत्तक जाण्यापुर्वी प्रतिवादी नंबर २ यास येदुच्या मिळकतीत हक्क प्राप्त झाल्याचे व प्राप्त झालेले हक्क कोणत्याही स्थितीत अगर दत्तकपत्राने जात नसल्याने अगर नष्ट होत नसल्याचे

सांगितले आहे. प्रतिवादी नंबर २ यांना मयत येदु व मयत चंद्राबाई यांच्या मिळकतीत कायद्याने हक्क प्राप्त होत असल्याचे नमुद केले आहे.

११. पुढे कैफियतीत त्यांनी वादी अथवा इतर प्रतिवादींनी वारस म्हणुन असलेल्या नोंदीविरुध्द कोणतीही तक्रार केली नाही किंवा त्या कमी करुन घेण्याचा प्रयत्न देखिल केला नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे estoppel ची बाधा येत असल्याचे नमुद केले आहे. सर्व दावा मिळकतीत प्रतिवादी नंबर २ चा इतर प्रतिवादी सोबत समाईक मालकी कब्जे वहिवाट असल्याचे नमुद करत सह हिस्सेदार असल्याचे नमुद केले आहे. त्याचप्रमाणे वादीनी दिनांक २३.०८.२००४ रोजी राजीखुषीने समजुन उमजुन प्रतिवादी नंबर ११ यांच्या हक्कात गट नंबर १००५ चे नमुद क्षेत्राबाबत कब्जे साठे खत करुन दिल्याचे व त्याचदिवशी रजिस्टर दस्त क्रमांक १०१३ अन्वये नोंद मुखत्यारपत्रात देखिल प्रतिवादी नंबर ११ च्या हक्कात करुन दिल्याचे कथन मांडले आहे. त्याचवेळेस इतर दस्ताबाबत वादीस माहिती असल्याचे नमुद केले आहे. त्याचप्रमाणे हस्तांतरण कायदा कलम ५२ पाहता वादीस विल्हेवाट, विक्री बाबत मागणी करता येत नसल्याचे नमुद करत वादी स्वच्छ हाताने न्यायालयात न आल्याने त्यांना कोणताही ताकीदी अनुषंगित हुकुम मागता येणार नसल्याचे सांगितले आहे. वरील सर्व बाबींचा उहापोह करत त्यांनी दावा व अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

१२. प्रतिवादी नंबर १ यांनी निशाणी ४५ वर पुरसीस देवुन प्रतिवादी नंबर २ यांनी नि.क्र.४४ वर दिलेली कैफियत अंगीकार केलेली आहे.

१३. प्रतिवादी नंबर ३अ, ३ब, ३क, ४ ते ८, १० ते १४ यांना दाव्याचे समन्सची बजावणी होवुन देखिल ते दाव्याच्या कामी गैरहजर राहिलेले आहेत. म्हणुन त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारित करण्यात आलेला आहे. तसेच प्रतिवादी नंबर १५ व १६ हे दाव्याच्या कामी हजर होवुन देखिल त्यांनी त्यांची कैफियत मुदतीत सादर केलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द विना कैफियत आदेश पारित करण्यात

आलेला आहे.

१४. वरील दोन्ही वाद कथने लक्षात घेता प्रस्तुत अर्जासाठी खालील मुद्दे विचारासाठी निघतात. त्याचे विवेचन मी पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीनी सकृतदर्शनी केस त्यांच्या पक्षात असल्याचे शाबीत केले आहे काय ? | नाही. |
| २ | दाव्याचा समतोल वादीच्या पक्षात असल्याचे वादी शाबीत करतो काय ? | नाही. |
| ३ | तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे वादी सिध्द करतो काय? | नाही. |
| ४ | काय आदेश? | अर्ज नामंजुर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>.

१५. वादी यांनी दावा मिळकती संदर्भात दावा मिळकतींचे सातबारा व सिटी सर्वे उतारे नि.क्र.८ ते १७ वर दाखल केले आहेत. सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांच्यापुढे झालेल्या जबाबाची प्रत, दावा मिळकतीचे फोटो, मे. दुय्यम निबंधक कवठेमहांकाळ यांना मुल्यांकनाबाबत खुलासा मिळणेबाबतचे पत्र, मे. दुय्यम निबंधक याचे उत्तरी माहिती पोलीस ठाण्याकडील तक्रारी अर्ज, चौकशी उतारा, दत्तकपत्राची झेरॉक्स प्रत, तालुका कार्यकारी दंडाधिकारी, कवठेमहांकाळ यांच्यासमोरील प्रतिवादी नंबर २ च्या प्रतिज्ञापत्राची झेरॉक्स प्रत, कवठेमहांकाळ व जिल्हा पोलीस प्रमुख यांच्याकडे दिलेल्या तक्रारी अर्जाच्या झेरॉक्स प्रति, आरसीसी केस नंबर ४९/२०१७ मधील न्यायनिर्णयाची झेरॉक्स प्रत, तालुका वैद्यकिय अधिकारी यांचे पत्र व त्यांना

दिलेला अर्ज, प्री लिटीगेशन नोटीस, इत्यादी कागदपत्रे निशाणी ३, निशाणी ५१, निशाणी ५६, निशाणी ६० व निशाणी ७८ सोबत दाखल केलेली आहे.

१६. प्रतिवादी नंबर २ यांनी कुलमुखत्यारपत्र, कब्जा साठेखत, फेरफार नंबर ३६८१, दावा मिळकतीचे उतारे, मुल्यांकन दाखले, दावा मिळकतीचा नकाशा इत्यादी कागदपत्रे निशाणी ४८ सोबत दाखल केलेली आहेत. तसेच निशाणी ५४ वर ग्रामपंचात मिळकत नंबर ४४९, ४५१, ४५० चे फोटो, दावा मिळकतीचे समोरुन व मागुन काढलेले फोटो दाखल केलेले आहेत.

मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबत -

१७. मुद्दे क्रमांक १ ते ३ हे ऐकमेकांशी संलग्न असल्याने मी त्यांचे विवेचन एकत्र देत आहे.

१८. वादी व प्रतिवादी नंबर २ यांची कथने पाहता प्रतिवादी नंबर २ हे १२.०५.१९८६ रोजी चंद्राबाई यांना दत्तक गेल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. त्या अनुषंगाने वादीनी दत्तकपत्र दाखल केले आहे. दत्तक जाण्यामुळे प्रतिवादी नंबर २ यांचा दावा मिळकतीत हक्क हितसंबंध राहत नाही, असा मुख्य आक्षेप वादीचा असल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे प्रतिवादी नंबर २ यांनी प्रतिवादी नंबर ११ बरोबर गट नंबर १००५ बाबत २ आणे ८ पै बाबतचा करारनामा संगनमताने दिनांक ०९.१०.२००३ रोजी केला असल्याचे कथन मांडले आहे. त्याचप्रमाणे तो करारनामा वादीवर बंधनकारक नसल्याचे कथन मांडले आहे.

१९. त्याचप्रमाणे प्रतिवादी यांनी त्यांचे वडील येदु यांचे निधन १९७९ साली झाल्याचे नमुद केले आहे. तसेच दावा मिळकतीमध्ये वडिलांच्या निधनानंतर महसुल दप्तरी नोंदी झाल्याचे व त्यास वादीनी कधीही आक्षेप घेतला नसल्याचे कथन मांडले आहे. त्याचप्रमाणे दत्तक जाण्यापुर्वी हक्क हितसंबंध निर्माण झाल्याने ते नंतरच्या दत्तक पत्राने संपुष्टात येत नसल्याचे कथन मांडले आहे. त्याचप्रमाणे वादीनी दिनांक

२३.०८.२००४ रोजी प्रतिवादी नंबर ११ च्या हक्कात गट नंबर १००५ बाबत नोंद कब्जे साठेखत व नोंद मुखत्यारपत्र केल्याचे नमुद केले आहे. ही बाब वादीनी लपवुन ठेवल्याचे कथन मांडले आहे. त्याचप्रमाणे सन २००४ मध्ये वादीनी गट नंबर १००५ बाबत व्यवहार करतांना प्रतिवादी नंबर २ व प्रतिवादी नंबर ११ यांच्यामध्ये झालेल्या व्यवहाराची माहिती असल्याचे सांगितले आहे.

२०. प्रतिवादी नंबर २ यांचे वडील सन १९७९ साली मयत झाल्याचे वादीचे व प्रतिवादी नंबर २ चे कथन आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी नंबर २ हे सन १९८६ साली दत्तक गेल्याचे दोन्ही पक्षकारांचे कथन आहे. दावा मिळकतीत प्रतिवादी नंबर २ यांच्या वडिलाच्या निधनानंतर म्हणजे सन १९७९ नंतर हक्क हितसंबंध निर्माण झाल्याचे वादी यानी त्यांच्या दाव्यात मान्य केले आहे. परंतु दत्तक विधानामुळे ते संपुष्टात आल्याचे कथन मांडले आहे. प्रस्तुत प्रकरणात पुर्वी प्राप्त झालेले हक्क हितसंबंध नंतरच्या दत्तक विधानाने संपुष्टात येतात, हा मुद्दा वादी यांनी कायद्यातील तरतुदींना अधिन राहुन स्पष्ट करणे आवश्यक आहे. सकृतदर्शनी वादी यांनी त्यांच्या या कथनांस कायदेशिर आधार स्पष्टपणे मांडलेला नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी नंबर २ व प्रतिवादी नंबर ११ यांच्यामधील गट नंबर १००५ बाबता करारनामा पाहता तो दिनांक ०९.१०.२००३ रोजीचा नोंदणीकृत करारनामा असल्याचे दिसुन येते. प्रस्तुतचा दावा हा दिनांक २५.०४.२०१६ रोजी दाखल केलेला आहे. यामध्ये साधारणतः १२ वर्षे ५ महिने इतका कालावधी लोटला गेल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर करारनाम्याच्या हक्क ज्ञापनांस मुदतीच्या कायद्याची सकृतदर्शनी बाधा असल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे विलंब हा न्यायतत्वास मारक ठरतो. त्यामुळे सदर बाबत वादी यांनी प्रस्तुत प्रकरणांतील वस्तुस्थिती मुदतीत आहे, याबाबत सिध्दता मिळवणे आवश्यक आहे. तसेच वादी नी गट नंबर १००५ बाबत प्रतिवादी नंबर ११ बरोबर दिनांक २३.०८.२००४ रोजी करारनामा केल्याचे प्रतिवादीनी कथन मांडले आहे व त्याबाबतचे नोंदणीकृत कुलमुखत्यारपत्र लिहुन दिल्याचे नमुद करुन त्याची प्रत व कब्जा साठेखत सादर केलेले आहे. सदर बाबत वादीनी त्यांच्या दाव्यामध्ये कथन मांडलेले नाही. त्याचप्रमाणे दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी नंबर १ यांचा कब्जा

आहे, या कथनांस सकृतदर्शनी छेद मिळतो. परिणामतः वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयात आला नसल्याचे दिसुन येते.

२१. वरील सर्व मुद्दयामुळे सकृतदर्शनी केस व दाव्याचा समतोल वादीच्या पक्षात रहात नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी नंबर २ व प्रतिवादी नंबर ११ यांच्यातील व्यवहार हा सन २००३ मधील आहे. त्याचप्रमाणे वादी व प्रतिवादी नंबर ११ यांच्यामधील दावा मिळकतीच्या गटाबाबत व्यवहार झाल्याचे प्रतिवादीने समोर आणलेले आहे. त्यामुळे दावा मिळकतीच्या कब्जाबाबत स्पष्टता येत नाही. त्याचप्रमाणे ज्या-त्या इसमाच्या निधनानंतर महसुल दप्तरी नोंदी झाल्याचे देखिल दाखल कागदपत्रावरुन समोर येते. त्यास वादीचा आक्षेप असल्याबाबत कोणताही सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा समोर आलेला नाही. सबब अंतरिम मनाई हुकुम न दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. करिता मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्रमांक ४ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. निशाणी ५ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२.. खर्चाचा विचार मुळ दाव्याच्या कामी करण्यात येतो.

Digitally signed by Shrinivas Arun Kulkarni
Date: 2020.07.29 13:43:23 +0530

दिनांक २८.०७.२०२०. (श्रीनिवास अ.कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कवठेमहांकाळ. कवठेमहांकाळ.